Maharashtra Shikshan Samiti, Nilanga

# Maharashtra Mahavidyalaya, Nilanga

## Dist. Latur (M.S.).

## Department of History

Organised

**One Day National Seminar**

**Under the theme '*Azadi Ka Amrit Mahotsav*'**

On

**"Maharashtra's Contribution in Indian Freedom Struggle"**

**"भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान"**

Sponsored by

Indian Council of Social Science Research, New Delhi

on

**01st October, 2022**

**News Paper Clippings**

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 7
03 Oct 2022



# इतिहासातील तुटलेले धागे संशोधकांनी जोडावेत : डॉ. रोडे

**निलंगा :** इतिहासातील संशयाचे भूत दूर करण्यासाठी अभ्यासकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. या प्रयत्नातूनच वस्तुनिष्ठ इतिहास जगासमोर येईल. इतिहासात अनेक नोंदी सुटून गेलेल्या आहेत, अनेक धागे तुटले आहेत, अशा इतिहासातील तुटलेल्या धाग्यांना जोडण्याचे काम संशोधकांनी करावे, असे मत ज्येष्ठ इतिहासकार, विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात आयोजित 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान' या विषयावर आयोजित एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. माधव कोलपुके हे उपस्थित होते.विचार मंचावर महाराष्ट्र शिक्षण समितीचे समन्वयक दिलीप धुमाळ, माजी इतिहास विभाग प्रमुख प्रा. मनोहर सांगवे उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. रोडे म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे योगदान महत्त्वपूर्ण आहे . सन १९३५ ते १९४७ या कालखंडात देशाची राजधानी सेवाग्राम (वर्धा) होती. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण, सर्व सूत्र महात्मा गांधींच्या सेवाग्राममधून हलत होती. सूत्रसंचलन डॉ. नरेश पिनमकर यांनी केले. प्रस्ताविक डॉ. भास्कर गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. सुभाष बेंजलवार यांनी मानले.

पुण्य नगरी

# भारतीय स्वातंत्र्य लढ्याला वैचारिक नेतृत्व महाराष्ट्राने दिले : डॉ. बगाडे

**निलंगा :** आपला देश पारतंत्र्यात असताना स्वातंत्र्याची जाणीव समाजात निर्माण करण्याचे काम समाजसुधारकांनी केले. प्रत्येकांची भूमिका वेगवेगळी असली तरी उद्देश मात्र एक होता तो म्हणजे स्वातंत्र्य. महात्मा फुले, बाळ गंगाधर टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही स्वातंत्र्य लढ्यातील वैचारीक परंपरा महाराष्ट्रातील आहे. गांधीवाद विकसीत करण्यातही महाराष्ट्राचेच मोठे योगदान आहे. म्हणून विचारांचे नेतृत्व देशाला महाराष्ट्रानेच दिलेले आहे, असे मत औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रोफेसर डॉ. उमेश बगाडे यांनी व्यक्त केले.



निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त इतिहास विभागाच्यावतीने आयोजित भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद नवी दिल्ली द्वारा पुरस्कृत 'भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे योगदान' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीज भाषणात ते बोलत होते. चर्चासत्राचे उद्घाटन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे सचिव बब्रुवान सरतापे, चर्चासत्रासाठी साधनव्यक्ती म्हणून उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद येथील डॉ. इंदिरा सुर्यवंशी, हैदराबाद येथील पुराभिलेख व वस्तुसंग्रहालय विभागाचे संचालक भुजंग बोबडे, औरंगाबाद येथील डॉ. गीतांजली बोराडे, परभणी येथील शारदा महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. नितीन बावळे, यशवंत महाविद्यालय नांदेड येथील डॉ. शिवराज बोकडे, बहीर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत येथील प्रा. डॉ.रामभाऊ मुटकुळे, लातूर येथील डॉ.सदाशिव दंदे आदी उपस्थित होते. उद्घाटनपर मनोगतात डॉ. श्रीपाल सबनीस यांनी लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत दिलेल्या योगदानावर भाष्य केले तसेच हैदराबाद मुक्ती लढ्यातील क्रांतिकारकांनी दिलेल्या योगदानावरही विवेचन केले. चर्चासत्रास संयोजक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपूके यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख मांडला, तर चर्चासत्राच्या पाठीमागील भूमिका संयोजन सचिव डॉ. सुभाष बेंजलवार यांनी मांडली. याप्रसंगी महाराष्ट्र फार्मसीचे प्राचार्य डॉ.भागवत पौळ, दिलीप धुमाळ, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड, माजी इतिहास विभागप्रमुख सांगवे एम. पी. तसेच महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरून अनेक संशोधक, मार्गदर्शक, विद्यार्थी, इतिहासप्रेमी यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. अजित मुळजकर, डॉ. नरेश पिनमकर, डॉ. ज्ञानेश्वर चौधरी व डॉ. हंसराज भोसले यांनी केले. आभार चर्चासत्राचे सहसमन्वयक डॉ. भास्कर गायकवाड यांनी मानले.

Latur Edition
Oct 4, 2022 Page No. 05
Powered by : eReleGo.com

बालाजी मुस्कावाड यांनी केले. आभार पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के यांनी मानले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सुनील महिंद्रकर, सुधीर गायकवाड, [illegible], [illegible], बालाजी कांबळे, सर्व हाऊस मास्टर यांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला.

सो.तरुणभारत



## इतिहासातील तुटलेले धागे जोडण्याचे काम संशोधकांचे

**निलंगा दि. २ ऑक्टोबर :**

इतिहासातील संशयाचे भूत दूर करून अभ्यासकांनी वस्तुनिष्ठ इतिहास जगासमोर आणावे. इतिहासात बऱ्याचशा नोंदी सुटून गेलेल्या असून बरेचसे धागे तुटलेले आहेत, अशा इतिहासातील तुटलेल्या धाग्यांना जोडण्याचे काम संशोधकांनी करावे असे मत ज्येष्ठ इतिहासकार, विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र महाविद्यालयात भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद,नवी दिल्ली द्वारा पुरस्कृत ''भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान'' या विषयावर आयोजित एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. माधव कोलपुके, समन्वयक दिलीप धुमाळ, प्रा.मनोहर सांगवे आदी मंचावर उपस्थित होते. राष्ट्रीय चर्चासत्राचे उदघाटन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. उदघाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे सचिव बब्रुवान सरतापे होते. डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे प्रा. डॉ.उमेश बगाडे यांचे बीजभाषण झाले.चर्चासत्रासाठी साधनव्यक्ती म्हणून उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद चे डॉ. इंदिरा सुर्यवंशी, हैदराबाद येथील पुराभिलेख व वस्तुसंग्रहालय चे संचालक भुजंग बोबडे, डॉ. गीतांजली बोराडे, प्रा. डॉ. नितीन बावळे, डॉ. शिवराज बोकडे, वसमतचे प्रा.डॉ.रामभाऊ मुटकुळे, लातूरचे प्रा. डॉ.सदाशिव दंदे इत्यादिंनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महाराष्ट्राचे योगदान या विषयावर आपले विचार व्यक्त केले. प्राचार्य डॉ.भागवत पौळ, उपप्राचार्य डॉ.सी.जे.कदम, उपप्राचार्य प्रशांत गायकवाड आदी सह मोठ्या संख्येने इतिहास प्रेमी नागरिक, विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते चर्चासत्राची भूमिका संयोजन सचीव डॉ. सुभाष बेंजलवार यांनी मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अजित मुळजकर, डॉ. नरेश पिनमकर व डॉ. ज्ञानेश्वर चौधरी व डॉ. हंसराज भोसले यांनी केले. आभार चर्चासत्राचे सहसमन्वयक डॉ. भास्कर गायकवाड यांनी मानले.

दैनिक
राजधर्म

# भारतीय स्वातंत्र्य लढ्याला वैचारिक नेतृत्व महाराष्ट्राने दिले:डॉ.उमेश बगाडे

**निलंगा,प्रतिनिधी**:देश पारतंत्र्यात असताना स्वातंत्र्याची जाणीव समाजात निर्माण करण्याचे काम समाजसुधारकांनी केले. प्रत्येकाची भूमिका वेगवेगळी असली तरी उद्देश मात्र एक होता तो म्हणजे स्वातंत्र्य.महात्मा फुले, बाळ गंगाधर टिळक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही स्वातंत्र्य लढ्यातील वैचारीक परंपरा महाराष्ट्रातील आहे. गांधीवाद विकसीत करण्यातही महाराष्ट्राचेच मोठे योगदान आहे. म्हणून विचारांचे नेतृत्व देशाला महाराष्ट्रानेच दिलेले आहे.असे मत औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रोफेसर,डॉ.उमेश बगाडे यांनी व्यक्त केले.निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त इतिहास विभागाच्या वतीने आयोजित भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद,( )नवी दिल्ली द्वारा पुरस्कृत ''भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे योगदान'' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीज भाषणात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की धर्माने ज्या अमानुष रुढी निर्माण केल्या,लादल्या त्यापासून मुक्ती मिळवणे,स्वातंत्र्य मिळवणे हे स्वातंत्र्य समाज सुधारकांनी पेरले.स्वातंत्र्याच्या पाठीमागे नैतिक तत्त्वज्ञान असावे असेही ते म्हणाले.या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन अखिल



भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या उद्घाटकीय मनोगतातून टिळक,महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा फुले, यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत दिलेल्या योगदानावर भाष्य केले तसेच हैदराबाद मुक्ती लढ्यातील क्रांतिकारकांनी दिलेल्या योगदानावरही विवेचन केले.या चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे सचिव बब्रुवानजी सरतापे उपस्थित होते.चर्चासत्रासाठी साधनव्यक्ती म्हणून उस्मानिया विद्यापीठ,हैदराबाद येथील डॉ.इंदिरा सुर्यवंशी,हैदराबाद येथील पुराभिलेख व वस्तुसंग्रहालय विभागाचे संचालक भुजंग बोबडे,औरंगाबाद येथील डॉ.गीतांजली बोराडे,परभणी येथील शारदा महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. नितीन बावळे,यशवंत महाविद्यालय नांदेड येथील डॉ.शिवराज बोकडे, बहीर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत येथील प्राध्यापक डॉ.रामभाऊ मुटकुळे,लातूर येथील डॉ.सदाशिव दंदे इत्यादिंनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महाराष्ट्राचे योगदान या विषयावर सविस्तर अशी चर्चा केली.या चर्चासत्राच्या समारोप समारंभात प्रमूख पाहूणे म्हणून मार्गदर्शन करताना लातूर येथील ज्येष्ठ विचारवंत डॉ.सोमनाथ रोडे यांनी स्वातंत्र्य लढ्यातील अनेक घटनांवर प्रकाश टाकून त्या आपण सकारात्मक पद्धतीने समजावून घेतल्या पाहीजेत असे आवाहन आपल्या मार्गदर्शनातून केले.या चर्चासत्रास संयोजक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.माधव कोलपूके मार्गदर्शन केले.याप्रसंगी महाराष्ट्र औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भागवत पौळ,महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे समन्वयक दिलीप धुमाळ,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.प्रशांत गायकवाड,माजी इतिहास विभागप्रमुख सांगवे एम.पी.तसेच महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरून अनेक संशोधक,मार्गदर्शक,विद्यार्थी, इतिहासप्रेमी यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती चर्चासत्रात होती. महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचा आलेख प्राचार्य डॉ.माधव कोलपुके यांनी आपल्या भुमिकेत मांडला,तर चर्चासत्राच्या पाठीमागील भूमिका संयोजन सचीव डॉ.सुभाष बेंजलवार यांनी मांडली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अजित मुळजकर डॉ.नरेश पिनमकर व डॉ.ज्ञानेश्वर चौधरी व डॉ. हंसराज भोसले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार चर्चासत्राचे सहसमन्वयक डॉ.भास्कर गायकवाड यांनी मानले.

Latur Edition
Oct 4, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com

# इतिहासातील तुटलेले धागे जोडण्याचे काम संशोधकांनी करावे : डॉ. सोमनाथ रोडे

निलंगा, पुढारी वृत्तसेवा : इतिहासातील संशयाचे भूत दूर करण्यासाठी अभ्यासकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. या प्रयत्नातूनच वस्तुनिष्ठ इतिहास जगासमोर येईल. इतिहासात बऱ्याचशा नोंदी सुटून गेलेल्या आहेत, बरेचसे धागे तुटलेले आहेत, अशा इतिहासातील तुटलेल्या धाग्यांना जोडण्याचे काम संशोधकांनी करावे, असे मत ज्येष्ठ इतिहासकार, डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केले.



येथील महाराष्ट्र महाविद्यालयात आयोजित भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान या विषयावर आयोजित एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपुके होते. विचार मंचावर महाराष्ट्र शिक्षण समितीचे समन्वयक दिलीप धुमाळ, माजी इतिहास विभागप्रमुख प्रा. मनोहर सांगवे यांची उपस्थिती होती. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान किती महत्त्वपूर्ण आहे. यावर आपली भूमिका स्पष्ट करताना डॉ. रोडे म्हणाले की, १९३५ ते १९४७ या कालखंडात देशाची राजधानी सेवाग्राम (वर्धा) होती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, सर्व सूत्र महात्मा गांधींच्या सेवाग्राममधून हलत होती. यावरून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राची भूमिका किती महत्त्वाची होती लक्षात येते. डॉ. प्रास्ताविकात भास्कर गायकवाड यांनी दिवसभर झालेल्या विविध सत्रांचा लेखा-जो मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेश पिनमकर यांनी केले. आभार सुभाष बेंजलवार यांनी मानले.

पुढारी

# इतिहासातील तुटलेले धागे जोडण्याचे काम संशोधकांनी करावे : डॉ. सोमनाथ रोडे



**निलंगा, पुढारी वृत्तसेवा :** इतिहासातील संशयाचे भूत दूर करण्यासाठी अभ्यासकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. या प्रयत्नातूनच वस्तुनिष्ठ इतिहास जगासमोर येईल. इतिहासात बऱ्याचशा नोंदी सुटून गेलेल्या आहेत, बरेचसे धागे तुटलेले आहेत, अशा इतिहासातील तुटलेल्या धाग्यांना जोडण्याचे काम संशोधकांनी करावे, असे मत ज्येष्ठ इतिहासकार, डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केले.

येथील महाराष्ट्र महाविद्यालयात आयोजित भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान या विषयावर आयोजित एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपुके होते. विचार मंचावर महाराष्ट्र शिक्षण समितीचे समन्वयक दिलीप धुमाळ, माजी इतिहास विभागप्रमुख प्रा. मनोहर सांगवे यांची उपस्थिती होती. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान किती महत्त्वपूर्ण आहे. यावर आपली भूमिका स्पष्ट करताना डॉ. रोडे म्हणाले की, १९३५ ते १९४७ या कालखंडात देशाची राजधानी सेवाग्राम (वर्धा) होती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, सर्व सूत्र महात्मा गांधींच्या सेवाग्राममधून हलत होती. यावरून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राची भूमिका किती महत्त्वाची होती हे लक्षात येते. डॉ. प्रास्ताविकातून भास्कर गायकवाड यांनी दिवसभरात झालेल्या विविध सत्रांचा लेखा-जोखा मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नरेश पिनमकर यांनी केले. आभार डॉ. सुभाष बेंजलवार यांनी मानले.

My Latur Edition
Oct 4, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# इतिहासातील तुटलेले धागे जोडण्याचे काम संशोधकांनी करावे - डॉ. सोमनाथ रोडे

निलंगा - इतिहासातील संशयाचे भूत दूर करण्यासाठी अभ्यासकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. या प्रयत्नातूनच वस्तुनिष्ठ इतिहास जगासमोर येईल. इतिहासात बऱ्याचशया नोंदी सुटून गेलेल्या आहेत, बरेचसे धागे तुटलेले आहेत, अशा इतिहासातील तुटलेल्या धाग्यांना जोडण्याचे काम संशोधकांनी करावे असे मत ज्येष्ठ इतिहासकार, विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात आयोजित भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान या विषयावर आयोजित एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे योगदान किती महत्त्वपूर्ण आहे यावर आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले की, १९३५ ते १९४७ या कालखंडात देशाची राजधानी सेवाग्राम (वर्धा) होती. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण, सर्व सूत्र महात्मा गांधींच्या सेवाग्राम मधून हलत होती. यावरून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राची भूमिका किती महत्त्वाची होती हे लक्षात येते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपुके होते. विचार मंचावर महाराष्ट्र शिक्षण समितीचे समन्वयक मा. दिलीप धुमाळ, माजी इतिहास विभाग प्रमुख प्रा. मनोहर सांगवे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नरेश पिनमकर यांनी केले. दिवसभरात झालेल्या विविध सत्रांचा लेखा-जोखा प्रस्ताविकातून डॉ. भास्कर गायकवाड यांनी मांडला, तर या चर्चासत्रासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरून उपस्थित असलेल्या आणि चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केलेल्या सर्वांचे आभार डॉ. सुभाष बेंजलवार यांनी मानले.